महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ 9 /२०२३ दि. 3 /०१/२०२३

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** कोपरी ठाणे (पुर्व) येथील गांवदेवी सेवा मंडळ कोपरी कॉलनी स्टेशन रोड, ठाणे येथे दि. ०६/०१/२०२३ रोजी गावदेवी (चिखलादेवी) मातेची यात्रा साजरी करण्यात येणार आहे. सदर यात्रेनिमित्त गांवदेवी मंदिर व परिसरात भाविकांची गर्दी होणार असल्याने सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी मी, डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कोपरी सर्कल, सिध्दार्थनगर मार्गे, ठाणे पुर्व स्टेशनकडे जाणा–या सर्व प्रकारच्या जड वाहनांना, खाजगी बसेस यांना कोपरी सर्कल येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने व खाजगी बसेस कोपरी सर्कल येथुन परत फिरुन जातील.

**प्रवेश बंद –** २) कोपरी सर्कल, सिध्दार्थनगर मार्गे ठाणे पुर्व स्टेशनकडे जाणारी हलकी चार चाकी, दुचाकी, तीन चाकी वाहने, टी.एम.टी., एन.एम.एम.टी., बेस्ट बसेस यांना हसिजा कॉर्नर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) सदरची वाहने हसिजा कॉर्नर येथुन उजवीकडे वळण घेवून इच्छित स्थळी जातील.

ब) हलकी, चार चाकी व दुचाकी वाहने कोपरी सर्कल येथून उजवीकडे वळण घेवून बारा बंगला, ठाणेकर वाडी, कन्हैयानगर, पारशीवाडी मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.

**नो इंट्री, नो पार्किंग –** खाजगी चारचाकी वाहने, दुचाकी वाहने यांना **हसिजा कॉर्नर ते ट्विन्स् हॉटेल पर्यंत नो इंट्री, नो पार्किंग झोन करण्यात येत आहे.**

सदरची वाहतूक अधिसुचना दि. ०६/०१/२०२३ रोजी सकाळी ०६:०० ते रात्रौ २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा.पोलीस उप आयक्त. परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :-**

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई/मिरा भाईंदर महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :- सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. नौपाडा, कोपरी वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner